RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# संस्कृत अध्यापनपदधती – आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम

*प्रा. नांगरे नूतन कृष्णराव*

**प्रस्तावना**

मानवी जीवनात शिक्षणाला अत्यंत महत्व आहे. यासाठी शिक्षण महत्वाचे आहे आणि म्हणून शिक्षणाचा अर्थ पहायचा म्हणजे जीवनाचा अर्थ पाहण्यासारखे आहे. कारण मानवी संस्कृतीची प्राथमिक अवस्था पाहिली तर या अवस्थेत मानव जे शिकत होता ते इतके नकळत आणि सहजपणे की, त्याला तू हे शिकतो आहेस म्हटले असते तर आश्चर्य वाटले असते यातल्याच काही व्यक्तींनी निसर्गाचा, जीवनाचा, मानवी संबंधाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून मानवी संस्कृतीची निर्मिती सुरु झाली. अगदी रानटी अवस्थेतील मानवी जीवन संपून एका नव्या अवस्थेला सुरुवात झाली. निसर्गपूजा, निसर्गगायन घडू लागले. आणि माणूस जीवनाचा अर्थ शोधू लागला. यातून तत्वज्ञान, महाकाव्य, धर्म आणि कला, विकास पावल्या. सामाजिक जीवनात धार्मिकतेला महत्व प्राप्त झाले. हे धार्मिक ग्रंथ संस्कृत भाषेत असल्यामुळे गुरुची आवश्यकता निर्माण झाली आणि त्यातून शिक्षणाची सुरुवात झाली. जीवनाचे ध्येय आत्मसाक्षात्कार व आत्मज्ञान हे असल्यामुळे शिक्षणाचे ध्ययेही चारी पुरुषार्थांची साधना व मोक्षप्राप्ती हे ठरविण्यात आले त्यातून गुरुकुल पध्दतीच्या शिक्षणाची सुरुवात झाली. अशाप्रकारे जीवनासाठी शिक्षणाची सुरुवात झालेली दिसून येते.

यानंतरच्या ब्रिटीश काळामध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षण घेणा–यांची संख्या वाढली, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, मुलींचे तसेच सामाजिकदृष्टया दुर्बल घटकांचे शिक्षण यामुळे पूर्वीसारखी गुरुकुल पद्धती कालबाहय ठरली.

त्यानंतरच्या काळात मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र या शाखांचा विकास, तंत्रविज्ञानाचा वाढता वापर, संशोधनाची वाढलेली गती यामुळे 'शिक्षक जन्मावा लागतो' ही संकल्पना हळूहळू मागे पडून 'शिक्षक कसा घडविता येतो' असा विचार सुरु झाला. यातून 'शिक्षक प्रशिक्षण' ही संकल्पना पुढे आली.

सध्या तर माहिती प्रस्फोटाच्या काळात माहिती बदलण्याचा वेग प्रचंड आहे. कालची माहिती आज जुनी होत आहे. त्यामुळे विषयज्ञान बदलते. याचे सातत्याने नूतनीकरण गरजचे आहे. तसेच नवीन अध्यापनपध्दती, तंत्रे, क्लुप्त्या अध्यापनाची साधने या बाबींचा शिक्षकाला परिचय होणे व या सर्वांचा दैनंदिन अध्यापनात वापर करता येणे गरजेचे झाले आहे. यासाठी शिक्षकी पेशामध्ये येणा–या व्यक्तीला पद्धतशीर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तरच त्यांचे अध्यापन कौशल्य विकसित होईल.

यादृष्टीने शिक्षक प्रशिक्षणाच्या इतिहासाकडे वळून पाहिले असता असे दिसून येते की, सुरुवातीच्या नॉर्मल स्कूलमध्ये विषयज्ञानावर प्रभुत्व असणे आणि शाळांमध्ये प्रत्यक्ष सराव करणे या दोहोंचा शिक्षक प्रशिक्षणात समावेश होता. याचाच अर्थ विषयज्ञानावरील प्रभुत्व या घटकाला प्रशिक्षणात त्याकाळी महत्व दिले गेले होते. मात्र पुढील काळात अध्यापनशास्त्राचा जसजसा विकास होत गेला आणि नवीन अध्यापन पद्धतींची भर पडत गेली तसतसे त्या पद्धतींचे प्रशिक्षण देणे या घटकालाही महत्व प्राप्त होत गेले. एक वर्षांच्या सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणात तर असे स्पष्टपणे गृहीत धरले गेले आहे की, शालेय स्तरावर शिकविण्यासाठी आवश्यक असणारे विषयज्ञान / आशयज्ञान छात्रअध्यापकाने पदवी पर्यंतच्या आणि पदव्युत्तर शिक्षणातून प्राप्त केलेले असते. त्यामुळे या सेवापूर्व प्रशिक्षणात प्रामुख्याने अध्यापन पद्धतींनाच अधिक महत्व दिले गेले.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

अलीकडच्या काळातील अध्यापनातील संशोधनावरदेखील 'आशययुक्ततेचा' (Content freeness) प्रभाव दिसून येतो. यातून अध्यापनशास्त्र वृद्धिंगत झाले असले तरी शिक्षक परिणामकारकतेत प्रत्यक्ष कितपत सुधारणा झाली हा प्रश्न राहतोच. अध्यापन पद्धतींना दिल्या जाणा–या महत्वाबरोबरच छात्राध्यापकांचे विषयज्ञान या दोहोंचाही विचार शिक्षक प्रशिक्षणात झाला पाहिजे हे सातत्याने व प्रकर्षाने जाणवते.

त्याचप्रमाणे जागतिकीकरणानंतर बदललेल्या परिस्थितीत उच्च शिक्षणाचा मोठया प्रमाणात होत असलेला विस्तार आणि आवश्कतेपेक्षा कमी प्रमाणात उपलब्ध असलेले शिक्षक या पार्श्वभूमीवर 'गुणवत्तापूर्ण शिक्षकांची कमतरता' ही एक शैक्षणिक आपत्तीच ठरत आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षक समाजाला लाभावेत यासाठी शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीचा एक भाग म्हणून सेवापूर्व प्रशिक्षणासाठी येणा–या छात्र अध्यापकांच्या विषय ज्ञानाला उजाळा देण्यासाठी आशयज्ञानाची चाचणी एक वर्षाच्या सेवापूर्व प्रशिक्षणात घेणे व त्यांच्या आशयसमृद्धीसाठी कार्यक्रम तयार करणे हे आवश्यक ठरते.

**आशयज्ञान व आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :**

**आशयज्ञान**

अध्यापन करताना प्रशिक्षणार्थी जो आशय विद्यार्थ्यांना शिकविण्यासठी निश्चित करतो ते आशयज्ञान (Content knowledge)

**आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम**

विषयाचे आशयज्ञान अधिकाधिक प्रगल्भ, विस्तृत व्हावे यासाठी तयार केलेला कार्यक्रम.

संस्कृत अध्यापन पद्धतीच्या प्रशिक्षणार्थीसाठी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा येथे राबविलेला संस्कृत विषयासाठीचा आशयज्ञान वृद्धी कार्यक्रम आपण सविस्तर पाहू या

संस्कृत अध्यापन पद्धतीसाठी आशयज्ञान वृद्धी कार्यक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

1. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या संस्कृत भाषाविषयक आशयज्ञानाची निश्चिती करणे.
2. संस्कृत भाषाविषयक आशयज्ञानाच्या वृद्धीसाठी कार्यक्रम तयार करणे.
3. आशयज्ञान वृद्धी कार्यक्रम राबविणे.

या उद्दिष्टानुसार 2012–13 या शैक्षणिक वर्षातील संस्कृत अध्यापन पद्धतीसाठीच्या छात्राध्यापकांसाठी आशयज्ञान चाचणी तयार करण्यात आली. ही चाचणी गद्य, पद्य, व्याकरण व रचना या घटकांना अनुसरुन तयार करण्यात आली.

या चाचणीमध्ये गद्य, पद्य, व्याकरण, रचना यांना अनुसरुन देण्यात आलेले प्रश्न पुढीलप्रमाणे :

1. पद्यसमुहांचे मराठी भाषांतर करा.
2. टीपा लिहा.
3. संस्कृतात निबंध लिहा.
4. संस्कृत संभाषण पूर्ण करा.
5. व्याकरण – संधी, समास, रुपे, समानार्थी शब्द

एकूण 40 गुणांची ही चाचणी संस्कृत अध्यापनपद्धती च्या 13 विद्यार्थ्यांना देण्यात आली.

पेपर तपासणीनंतर पुढे आलेले गुणरुपातील फलित पुढीलप्रमाणे :

RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आशयज्ञान चाचणी
पेपर : 6 : संस्कृत अध्यापनपद्धती
2012–2013

एकूण गुण : 40
विद्यार्थी संख्या : 13

| घटक | प्र.क. | उत्तम गुण | मध्यम गुण | कनिष्ठ गुण |
|---|---|---|---|---|
| गद्य | 2 | \| \| | ~~\|\|\|~~\| | ~~\|\|\|\|\|~~ |
| पद्य | 1 | \| \| \| | \| | ~~\|\|\|\|~~ |
| व्याकरण | 5 | \| \| \| | \| \| | ~~\|\|\|\|~~\| |
| रचना | 3 | \| \| | \| | ~~\|\|\|\|~~\|\|\|\| |
| | 4 | \| \| \| | \| | ~~\|\|\|\|~~\| |

| प्र.क. | एकूण गूण | उत्तम गुण | मध्यम गुण | कनिष्ठ गुण |
|---|---|---|---|---|
| **1** | 5 | 4 | 2/3 | 1/1.5/0 |
| **2** | 10 | 7 व अधिक | 5 व 6 | 4, 3, 2, 1, 0 |
| **3** | 10 | 6 व अधिक | 5 | 4 व त्यापेक्षा कमी |
| **4** | 5 | 5, 4 | 3 | 2, 1, 0 |
| **5** | 10 | 7 व अधिक | 5 व 6 | 4, 3, 2, 1, 0 |

या चाचणीतील पाचही प्रश्नांमध्ये विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या विश्लेषणावरुन असे लक्षात आले की, पाचही प्रश्नांमध्ये कनिष्ठ गुण मिळविणा–या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे.

त्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांसाठी आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम राबविण्यात आला जेणेकरुन उत्तम व मध्यम गुण मिळविणा–या विद्यार्थ्यांच्या आशयज्ञानामध्ये आणखी भर पडेल.

तो आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**आशयज्ञानसमृद्धी कार्यक्रम**
**2012—2013**

| घटक | कार्यक्रम | नियोजित महिना |
|---|---|---|
| गद्य | अवांतर वाचनासाठी पुस्तके सुचविणे सेमिनार्सची विभागणी करणे. | नोव्हेंबर / डिसेंबर |
| पद्य | दररोज एक सुभाषित व त्याचा अर्थ यांचा अभ्यास व त्याची पडताळणी | डिसेंबर |
| व्याकरण | इ. 8, 9, 10 वी च्या पाठयपुस्तकातील व्याकरणाचा अभ्यास व त्याची पडताळणी | डिसेंबर / जानेवारी |
| लेखन | संस्कृतमध्ये वाक्यरचना करता यावी यासाठी पाठाची प्रस्तावना संस्कृत भाषेमध्ये करणे, ंसस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन, संभाषण वर्गाच्या सीडीज दाखविणे | जानेवारी |

वरील वेळापत्रकाप्रमाणे आशय ज्ञान समृदध होण्यासाठी कार्यक्रम राबविल्यानंतर असे लक्षात आले की, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विषयासाठीच्या आशयाबाबत अभिरुची निर्माण झाली. आशयज्ञान वाढवावे यासाठी आपणही काही प्रयत्न केले पाहिजेत अशी जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.

**समारोप**

बी.एड. कॉलेजेसमध्ये प्रवेश घेणारे छात्राध्यापक हे भावी शिक्षक असतात. त्यामुळे त्यांचे आपल्या विषयाचे आशयज्ञान समृदध असेल तर त्यांचे अध्यापनही प्रभावी व परिणामकारक होऊ शकते. असे आशयज्ञान उत्तम असलेले शिक्षक त्यांच्या विदयार्थ्यांच्या ज्ञानामध्ये नक्कीच भर टाकू शकतात.

त्या दृष्टीने हा आशयज्ञान समृद्धी कार्यक्रम नक्कीच उपयुक्त ठरु शकतो.

**संदर्भ पुस्तके**

1. प्रा. कुलकर्णी, प्रा. भोसले — हिंदी विषयज्ञान एवंम पद्ध्ती
2. डॉ. दुनाखे —मराठीचे अध्यापन